**नियमित दिवाणी कब्जा क्र. ७५/२०२४ मधील नि.क्र. ३७ वरील आदेश**

( पारीत दिनांक – १०/०३/२०२६)

**आक्काताई भुपाल घराळ, वगैरे ०५ वि. श्री.सदाशिव आप्पाजी घराळ वगैरे ०२**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ व सह कलम १५१ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, वादी यांनी दावा घर मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत. दावा मिळकतीमध्ये वादी यांची समाईकात मालकी कब्जा वहिवाट असून प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत बांधकाम करु नये अशी मनाई ताकीद होवून मिळणेसाठी वादी यांनी सदरचा दावा दाखल केला असून दावेचे नि.५ गुणदोषावर चालून वादी यांचा तुर्तातूर्त मनाई अर्ज मे.कोर्टाने नामंजूर केला आहे. दरम्यानच्या काळात दावा मिळकतीत प्रतिवादी क्र.१ करीत असलेले बांधकाम पूर्ण केले आहे. त्यामुळे, वादी यांना सदरचा दाव्यामध्ये दुरुस्ती करणे भाग पाडले आहे. तरी, वादी यांना दुरुस्ती दावा अर्जी कलम ६ या मजकुरानंतर ६-अ, ६-ब, ६-क, ६-ड मधील जादा मजकूर नमूद करणेस परवानगी मिळणेस सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदरील अर्जास मागील बाजूस प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही. दुरुस्तीमुळे दावेचे स्वरुप बदलते. अर्ज प्रामाणिकपणाचा नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

५. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणी दावा कायम मनाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत प्रकरणात दावा अर्जी कलम ६ या मजकुरानंतर ६-अ, ६-ब, ६-क, ६-ड मधील जादा मजकूर नमूद करणेस व तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. नमुद दुरुस्तीचा विचार करता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीत केलेले बांधकाम पूर्ण केलेले असून त्याअनुषंगाने वादीने प्रस्तावित दुरुस्ती प्रस्तुत अर्जान्वये सुचविलेली असून सदरचे बांधकाम काढून घेणेबाबत प्रतिवादी क्र. १ यांना आदेश व हुकूम

होण्याची मागणी प्रस्तावित दुरुस्तीद्वारे वादींनी प्रस्तुत अर्जान्वये केलेली आहे. सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने दाव्याच्या आकारणीमध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने व त्याबाबतचा आज्ञार्थी हुकूम, ठराव व हुकूमनामा होण्याच्या अनुषंगाने वादीने प्रस्तुत अर्जान्वये दुरुस्तीची मागणी केलेली आहे. एकंदरीतच, सदर दुरुस्तीचा विचार करता, सदर दुरुस्ती ही पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करणेसाठी आवश्यक असल्याचे दिसून येते. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता तसेच दुरुस्तीच्या स्वरुपाचा विचार करता सदरची दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, दुरुस्तीचा व अर्जातील नमुद कारणांचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः-

**- आ दे श -**

१**)** अर्ज (निशाणी क्र.३७) वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रु. ४००/- खर्च (cost) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२**)** वादीनी मंजूर दुरुस्ती अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी.

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2026.03.10 17:41:23 +0900

कागल. **(प्रणिता एस.पाटील)**

दिनांक - १०/०३/२०२६ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.